# राज्य माहिती आयोग, मुख्यालय, मुंबई

माहितीचा अधिकार

**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये**
**दाखल झालेले अपील**

**क्र. मुमाआ/नों.क्र.२१००९२/२१/अ.क्र.५८८५/२४/०१**
**क्र. मुमाआ/नों.क्र.२१००९३/२१/अ.क्र.५८८६/२४/०१**
**क्र. मुमाआ/नों.क्र.२१००९४/२१/अ.क्र.५८८७/२४/०१**
**क्र. मुमाआ/नों.क्र.२१००९५/२१/अ.क्र.५८८८/२४/०१**
**क्र. मुमाआ/नों.क्र.२१००९६/२१/अ.क्र.५८८९/२४/०१**

**श्रीम. दत्तप्रभा गडाम / विद्या पि. गडाम**
Echapurti CHS, Room no. ४०२,
४th floor, RNA SRA Building. PAP
Project near shimpoli cable depot,
Chikuwadi, Borivali (W) Mumbai – ४०००९२.

**विरुद्ध**

**जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक अभियंता (इ व का) के/पूर्व विभाग**
बृहन्मुंबई महानगरपालिका, सहाय्यक आयुक्त
के/पूर्व विभाग यांचे कार्यालय,म.न.पा. मुंबई इमारत,
पहिला मजला, आझाद रोड, गुंदवली, अंधेरी (पू) मुंबई – ४०० ०६९.

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता के/पूर्व विभाग**
बृहन्मुंबई महानगरपालिका, सहाय्यक आयुक्त
के/पूर्व विभाग यांचे कार्यालय,म.न.पा. मुंबई इमारत,
पहिला मजला, आझाद रोड, गुंदवली, अंधेरी (पू) मुंबई – ४०० ०६९.

**द्वितीय अपील अर्ज सुनावणी दिनांक : २६.१२.२०२४**

अपीलकर्ता : अनुपस्थित. ट्रॅकिंग रिपोर्टप्रमाणे नोटीस दि. ०९.१२.२०२४ रोजी प्राप्त झाली आहे.

विद्यमान जन माहिती अधिकारी : अनुपस्थित

प्रथम अपीलीय अधिकारी : अनुपस्थित

| अपील क्रमांक | मूळ अर्जाचा दिनांक | जन माहिती अधिकाऱ्याच्या उत्तराचा दिनांक | प्रथम अपीलाचा दिनांक | प्रथम अपीलीय प्राधिकाऱ्याच्या निर्णयाचा/आदेशाचा दिनांक |
|---|---|---|---|---|
| ५८८५ | ०६.०३.२०२० | - | २२.०६.२०२० | ०३.१०.२०२० |
| ५८८६ | ०५.०२.२०२० | - | १४.०३.२०२० | ०३.१०.२०२० |
| ५८८७ | ०५.०२.२०२० | - | १७.०३.२०२० | ०३.१०.२०२० |
| ५८८८ | ०८.०२.२०२० | - | १७.०३.२०२० | ०३.१०.२०२० |
| ५८८९ | ०५.०२.२०२० | - | १७.०३.२०२० | ०३.१०.२०२० |

अपिलकर्तांनी प्रथम अपिलीय अधिकारी यांचे दि.०३.१०.२०२० रोजीचे आदेश संलग्न करुन दि.०८.०१.२०२१ रोजी आयोगाकडे द्वितीय अपिल दाखल केले आहे.

अपिलकर्तांनी माहिती अर्ज दि. ०५.०२.२०२०, दि. ०८.०२.२०२० व दि. ०६.०३.२०२० अन्वये खालीलप्रमाणे मुद्येनिहाय माहिती विचारलेली आहे :-

1. Inward No. of letter dated 12/06/2009 from Assistant Commissioner Office to K/East Ward B&F.
2. Name of the officer / Engg. deal / work on this complaint / application.
3. All interim orders and Final order passed on letter dated 12/6/2009.
4. All internal communication / letter between B&F to Assistant Commissioner / Deputy Commissioner (Zone-3) & Commissioner regarding letter dated 12/6/2009.

जन माहिती अधिकारींनी उत्तर न दिल्याने प्रथम अपिल अर्ज दाखल केला आहे.

प्रथम अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता के/पूर्व विभाग यांनी असे आदेश दिले की, जन माहिती अधिकारींनी कार्यालयीन अभिलेखात उपलब्ध असलेली माहिती ०७ दिवसांत उपलब्ध करुन देण्यात यावी", असे आदेश पारित केले आहे.

अपिलकर्ता यांनी आयोगाकडे दि. ०८.०१.२०२१ रोजी माहिती मिळाली नाही असे कारण नमूद करुन द्वितीय अपिल दाखल केले आहे.

आजच्या सुनावणीच्या वेळी अपीलार्थी, विद्यमान जन माहिती अधिकारी आणि विद्यमान प्रथम अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

विद्यमान जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक अभियंता (इ व का) के/पूर्व विभाग, श्री. सतीश आनेराव यांनी दि. ०९.१२.२०२४ रोजीच्या पत्रान्वये अपीलार्थी यांना कळविण्यात आले की, अपीलार्थी यांना अपेक्षित असलेली १४३ पृष्ठांची माहिती उपलब्ध करुन देण्यात आली असून राज्य माहिती आयोगाच्या आदेशानुसार पुनःश्च सदर कागदपत्रांचे परिक्षण करावयाचे असल्यास सोमवार ते शुक्रवार दुपारी ३ ते ५ या वेळेत पाहणी करुन आपणांस आवश्यक असणाऱ्या कागदपत्रांची छायांकित प्रत विनामुल्य प्राप्त करुन घेण्यात यावी. सदर पत्राची प्रत आयोगास सादर करण्यात आली आहे.

या अपिलासंदर्भातील कागदपत्रांचे अवलोकन केल्यानंतर आयोग या निष्कर्षावर येत आहे की, जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक अभियंता (इ व का) के/पूर्व विभाग यांनी अपीलार्थी यांना माहिती दिलेली आहे.

सबब आयोग पुढील आदेश देत आहे:

**आदेश**

**वरील पाच अपीले निकाली काढण्यात येत आहे.**

State Information Commission Maharashtra

**मुंबई**
**दिनांक :२६.१२.२०२४**

26-12-2024.
**( डॉ. प्रदीप व्यास )**
**राज्य मुख्य माहिती आयुक्त**